# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

लातूर शहर महानगरपालिका हददीतील मनपा मालकीच्या जागेमध्ये होर्डिंग्ज बोर्ड उभारुन जाहिरात प्रसारित करणेचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्त करण्याबाबतचा निविदा फॉर्म

साल सन 2025-26

CamScanner

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## मालमत्ता विभाग 3909
## जाहिर लिलाव सुचना क्र 1/25-26 दि. 9/05/2025

या व्दारे सर्व जनतेस व ठेकेदारांना जाहिर लिलाव सुचनेव्दारे कळविण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये होर्डिंग्ज उभारुन जाहिरात प्रसारित करणे करीता तीन वर्षाच्या कालावधी पर्यत प्रायोगिक तत्वावर नियम व अटीनुसार दयावयाचा आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | विवरण | अंदाजीत किंमत | लिलाव फॉर्मची किंमत | अनामत रक्कम (बयाना रक्कम) | सुरक्षा ठेव | जाहिर लिलाव दिनांक व वेळ | जाहिर लिलावाचे ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लातूर शहर महानगरपालिका हददीतील मनपा मालकीच्या जागेमध्ये होर्डिंग्ज उभारुन जाहिरात प्रसारित करणेचे हक्क प्रदान करण्यासाठी कंत्राटदार नियुक्त करणे बाबत. (साईज 10 x 15 चे 20 होर्डिंग्ज व 10 x 12 चे 18 होर्डिंग्ज) | 06.00 अक्षरी सहा लक्ष रु. | रु 2,000 | रु.2000 | रु.4000 | दि. 16/05/2025 वेळ 12.30 वाजता | मालमत्ता विभाग, मनपा लातूर | 3 वर्ष |

लिलावात भाग घेण्यासाठी अटी खालील प्रमाणे आहे.

1. लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या सोबत जोडलेल्या यादीमधील 38 ठिकाणी होर्डिंग्ज उभारुन जाहिरात प्रसारित करणे करीता लिलाव बोली बोलली गेली आहे ती बोली शासकीयबोली पेक्षा जास्त राहील त्यांनाच सदर ठिकाणे जाहिरात प्रसारित करणेचे हक्क प्रदान करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
2. जाहिर लिलावात भाग घेण्यासाठी निविदा फिस 2000/- ना परतावा व बयाना रक्कम रु 2000/- रु महानगरपालिकेकडे भरल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
3. शासकीय बोली ही रुपये 5000/- **(पाच हजार)** च्या पटीत बोलली जाईल.
4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदी मनपाने केलेले ठराव / उपविधी नियम अटी व अस्तित्वात येणारे अधिनियम इत्यादी मधील तरतुदी संबंधितावर बंधनकारक राहतील. या व्यतीरिक्त महानगरपालिकेने वेळोवेळी वरील गोष्टीस विसंगत न होता घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील.
5. लिलावात भाग घेणा-याकडे महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची थकबाकी (मालमत्ता कर, पाणी पटटी) असल्यास लिलावात भाग घेता येणार नाही.
6. कोणताही लिलाव मंजुर करणे अथवा नाकारणे व कारण न देता सर्व च्या सर्व लिलाव रदद करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
7. जाहिरात बोर्डची जाहिरात प्रसारीत करण्याची हक्कची 03 वर्षाची मुदत संपल्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार मुदत वाढवून देण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
8. लिलावात ज्याचे नावे जाहिरात बोर्ड ठेका मंजुर होईल त्यांनी शासनाचे नियमानुसार अनामत रक्कमेचा भरुणा करावा लागेल. त्यानंतरच जाहिरात बोर्ड ठिकाणचा ताबा देण्यात येईल. असे न

CamScanner

करणा-याचे नावे मंजुर झालेला ठेका रद्द करुन भरणा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल व सदर जाहिरात बोर्ड ठिकाणचा फेर लिलाव करण्यात येईल.

9. बोलीत बोललेल्या अंतीम रक्कमेपैकी 25 टक्के रक्कम 07 दिवसाच्या आत मनपा फंडात जमा केल्यानंतर, करारनामा करुन नियम व अटीनुसार मक्ता परवाना देण्यात येईल. सदरची रक्कम कार्यालयात जमा न केल्यास, अनामत रक्कम जप्त करुन पुनश्य जाहिर लिलाव घेण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा लातूर यांना राहतील.

10. मुदत संपण्याच्या दिवशीच ताबा महानगरपालिकेला दयावा लागेल. अन्यथा प्रती दिवशी 1000/- रु प्रमाणे दंड आकारला जाईल.

11. सदर जाहिरात बोर्डवर कोणत्याही स्वरुपात आक्षेपार्ह जाहिराती किंवा प्रक्षोभक / धार्मीक भावना दुखावणा-या जाहिराती दाखविता येणार नाहीत.

12. सदर जाहिरात बोर्डवर महानगरपालिकेच्या शासकीय जाहिराती / संदेश मोफत प्रसारित करणे बंधनकारक राहील.

13. वरील शर्ती व अटी फेर बदल करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला असुन त्याचे वेगळे कारण दिले जाणार नाही त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही.

14. सदरील ठिकाणी व्यवसाय करत असताना कोणतेही जिवित व वित्तीय हाणी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

15. भाडेपटयाने देण्यात आलेली मिळकत ही तारण / गहाण ठेवता येणार नाही. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थापित करता येणार नाहीत.

वरील अटीचा भंग झाल्यास त्यावर मनपाचा निर्णय अंतिम राहील.

(डॉ. पंजाब खानसोळे)
उपायुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

CamScanner